**<u>स्पे.मु.नं. १५/२०११ मधील निशाण ४४ खालील आदेश</u>**

१) प्रतिवादी याने निशाणी ४४ अन्वये सदर अर्ज हा, दि. १६.०८.२००९ रोजीचा दस्त हस्ताक्षर तज्ञाकडे तपासासाठी पाठविण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर वादीने निशाणी ४७ वर म्हणणे दाखल केलेले आहे.

२) वादी, प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

३) प्रतिवादीच्या अर्जातील कथन की, वादीने प्रतिवादीविरूध्द दिनांक १६.०८.२००९ रोजीच्या कराराआधारे खरेदीखत करून मिळावे म्हणुन दावा दाखल केलेला आहे. त्यास प्रतिवादीने कैफियत दाखल केलेली आहे व तो करार प्रतिवादीने लिहुन दिलेला नाही व त्यावर प्रतिवादी नं. १ ची सही नाही. ती सही बोगस आहे, अशा हरकती घेतलेल्या आहेत. त्यामुळे सदर करार हा हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यासाठी तसा आदेश करण्यात यावा व करारपत्रावरील शाईचे वय किती आहे, यासाठी रविंद्र काकडे, स्टेट एक्झामिनर ॲन्ड डॉब्चयुमेरून, पाषाण रोड, पुणे यांच्याकडे पाठविण्यात यावे अशी मागणी केलेली आहे.

४) वादीने निशाणी ४७ वर म्हणणे दाखल करून सदर अर्जास विरोध केलेला आहे. तसेच अर्जातील मजकुर फेटाळण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. या वादीचे कथन की, प्रतिवादीने अर्जामध्ये हस्ताक्षर तज्ञाचे नांव दाखल करून तो दस्त प्रतिवादीने हस्ताक्षर तज्ञ यांच्याशी संगनमत करून बेकायदेशिररित्या अर्ज दाखल केलेला आहे. वादीने दावा सन २०११ मध्ये दाखल केलेला आहे व त्यामध्ये मुळ करारनामा दाखल केलेला आहे. त्याचवेळी सन २०११ मध्ये कैफियत दाखल केलेली आहे. त्यानंतर सदरचा दावा हा पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादीने कैफियत देवुन चार वर्ष

झाली. चार वर्षामध्ये दस्त पाठविण्यासाठी काहीही हालचाल केलेली नाही. त्यामुळे हस्ताक्षर तज्ञाशी संगनमत करून खोटा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ हा ग्रामविकास अधिकारी आहे. त्यास तशा सह्यामध्ये बदल करण्याची सवय आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यासाठी योग्य व संयुक्तिक कारण नसल्यामुळे तो अर्ज फेटाळण्यात यावा.

५) प्रतिवादीचा अर्ज, उपलब्ध कागदपत्रे, वादीचे म्हणणे या सर्वांचे अवलोकन केले असता याठिकाणी प्रतिवादीने आपल्या कथनामध्ये सांगितलेले आहे की, दिनांक १६.०८.२००९ रोजीच्या दस्तामध्ये प्रतिवादी नं. १ ची सही नाही, ती सही बनावट आहे, अशा हरकती घेतलेल्या आहेत. याअनुषंगाने विचार करता प्रतिवादी नं. १ हा वरील दस्तावरील सही नाकारत आहे. त्याची सही नाही, असे कथन करीत आहे. याअनुषंगाने वादीचे कथन पाहता त्याचे म्हणणे की, सदर सही ही प्रतिवादी नं. १ नेच केलेली आहे आणि सदर अर्जास प्रतिवादीने विलंब लावलेला आहे आणि त्यासाठी दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असे नाही. याठिकाणी प्रतिवादी व वादी यांच्या परस्पर कथनांचा वरील गोष्टीसंदर्भात विचार करता याठिकाणी प्रतिवादी नं. १ ची सही सदर दस्तावर आहे किंवा नाही हा वाद प्रश्न निर्माण होतो. याठिकाणी सदर दस्तावरील सही आणि इतर दस्तावरील सह्या याचा अनुषंगिक विचार करता ती सही प्रतिवादी नं. १ चीच आहे याच्यासाठी जर ती हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्याचा आदेश झाल्यास याठिकाणी वादी अथवा प्रतिवादी यांचे कोणतेच नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा वाद प्रश्न सोडविण्यासाठी मदत होणार आहे. याअनुषंगाने विचार करता प्रतिवादी यांच्यातर्फे सदर दस्त हा हस्ताक्षर तज्ञाकडे अनुमान काढण्यासाठी पाठविण्यात यावा यासाठी काही न्यायनिवाडे दाखल केलेले आहेत. प्रतिवादीतर्फे *श्रीकांत बळवंत नलावडे वि.*

<u>*बजरंग यशवंत निंबाळकर व इतर, २०१४ (४) ऑल एमआर ३०२*</u>. त्यामध्ये खालीलप्रमाणे मत नोंदविलेले आहे ते खालीलप्रमाणे –

> *''Evidence Act (1872), S. 45. Expert opinion. Application for seeking opinion of hand writing expert. Suit for specific performance of agreement. Defendants have disputed their signature on document and suggested that document is fabricated document. Desire of plaintiff that signatures be sent to hand writing expert is just and proper to bring truth on record. Application allowed.''*

तसेच वरील अनुषंगाने प्रतिवादीतर्फे <u>*बी. नागराजप्पा वि. श्रीमती बोरम्मा आणि इतर, २०१० (५) ऑल एमआर (जर्नल) ३५.*</u> या न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे मत नोंदविलेले आहे ते खालीलप्रमाणे –

> *'Evidence Act (1872), Ss. 45, 73. Expert opinion. Signature on promissory note. Defendant disputing signature. Trial Court comparing handwriting or signature with specimen signature or handwriting. Held trial Court ought to have referred matter to handwriting expert and should not have itself acted as an expert.''*

वरील दोन्हीही न्यायनिर्णयाचा विचार करता जर सहीबाबत वादातीत केले असेल तर त्याच्या पडताळणीसाठी मत मागविण्यासाठी हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यात यावे असे गृहित धरले आहे. वरील न्यायनिर्णय आणि सद्यस्थितीचा विचार करता ते एकमेकांशी सुसंगत असे आहे. सबब याठिकाणी या व वरील गोष्टीचा विचार करता याठिकाणी प्रतिवादीने अर्जास योग्य व संयुक्तिक कारण दिलेले आहे. याठिकाणी प्रतिवादीने सदर

सहीचे वय काय आहे, यासंबंधी मागणी केलेली आहे. परंतु तशाप्रकारची मागणी मंजुर करता येणार नाही. याठिकाणी प्रतिवादी याने प्रतिवादी नं. १ चे सही असलेले इतर सार्वजनिक दस्तऐवज व न्यायालयामध्ये दाखल केलेले दस्तऐवज आणि न्यायालयासमोर केलेल्या सह्या याचा एकत्रितपणे हस्ताक्षर तज्ञाकडे मतासाठी पाठविणे योग्य व उचित होणार आहे. त्यामुळे या व वरील सर्व कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१ प्रतिवादीचा निशाणी ४४ वरील अर्ज हा मंजुर करण्यात येत आहे.

२ दिनांक १६.०८.२००९ रोजीचा दस्त हा इतर सार्वजनिक दस्तऐवज प्रतिवादीने त्याच्या सहीचे हजर केल्यानंतर हस्ताक्षर तज्ञाकडे योग्य ती फी व कागदपत्रे हजर केल्यानंतर पाठविण्यात यावीत.

३ प्रतिवादीस आदेश करण्यात येतो की, प्रतिवादी नं. १ यांच्या सहीचे इतर सार्वत्रिक दस्तऐवजाच्या मुळ प्रती हजर करण्यात याव्यात.

४ हस्ताक्षर तज्ञाचा खर्च हा प्रतिवादी यांनी देण्याचा आहे. तो परस्पर त्या कार्यालयामध्ये भरण्यात यावा.

**( एस. एस. इंदलकर )**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस.

दिनांक : १६.१२.२०१५.

# **C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. M. Malkapalli**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **16.12.2015.**

(d) Order uploaded on : **16.12.2015.**